# पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय

## प्रेसनोट दिनांक ११/०८/२०२२

## दहिहंडी उत्सवाच्या नावाखाली जबरदस्तीने वर्गणी गोळा करण्यासाठी दरोडा टाकणाऱ्या मंडळाच्या कार्यकर्त्यांना अटक

**(वाकड पोलीस ठाणे तपास पथकाची कारवाई)**

--- ०० ---

वाकड पोलीस ठाणे येथे तक्रार प्राप्त की, दिनांक ०९/०८/२०२२ रोजी रात्री ०८.०० वा चे सुमा. जयभवानी चौक परिसरामध्येच राहणारे विजय तलवारे, सुनिल शेट्टी, माऊली उपल्ले, यश रसाळ, रोहित शिंदे ऊर्फ बॉन्ड, मनेश ऊर्फ मन्या कदम, प्रसाद राऊत, व त्यांचेसोबतचे इतर तीन ते चार लोकांनी तक्रारदार यांचे स्नॅक्स अॅन्ड स्वीट सेंन्टर या दुकानामध्ये येवुन सुनिल शेट्टी याने तक्रारदार यांचा भाऊ विवेक यास दहिहंडीच्या वर्गणीची मागणी करुन त्याचे हातातील वर्गणीचे पुस्तक विवेक याचेकडे दिले, त्यावेळी विवेक याने त्यांना १००/- रुपये देवु केले, परंतु शेट्टी याने ते घेण्यास नकार देवुन विवेक याचे कानाखाली मारुन ५००/- रु ची मागणी केली, त्यावेळी विवेक याने २००/- रु देवु केल्याने सुनिल शेट्टी, विजय तलवारे व त्यांचे सोबतच्या साथीदारांनी यांनी दुकानाचे नुकसान करुन काऊंटरचे गल्यातील दिवसभरामध्ये झालेल्या धंद्याचे अंदाजे १० ते १२ हजार रुपये जबरदस्तीने काढुन घेवुन, पुढील महिन्यापासुन दरमहिन्याला हप्ता चालु करायचा, नाहीतर तुमचे आईवडिलांना मारुन टाकु अशी धमकी देवुन, दुकानासमोर आरडाओरडा करुन, दहशत माजवुन तेथुन सर्वजन निघुन गेले अशी खबर प्राप्त झाली होती. फिर्यादी यांचे तक्रारीवरुन वाकड पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ६९२/२०२२ भा.दं.वि.कलम ३९५, ३८७, ४२७, ५०४, ५०६, महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(३) सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

घडलेले गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, वाकड पोलीस स्टेशन यांना गुन्ह्याचे योग्य प्रकारे अन्वेषण करुन तात्काळ आरोपींचा शोध घेऊन आरोपी अटक करणेबाबत आदेशित केले. त्यानुसार श्री. सत्यवान माने यांनी त्यांचे अधिनस्थ तपास पथकातील सपोनि श्री. संतोष पाटील, सपोनि श्री. संभाजी जाधव व अंमलदार यांना सुचना दिल्या.

वाकड पोलीस ठाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार यांच्या वेगवेगळ्या टिम तयार करुन आरोपींचा शिताफीने शोध घेऊन **आरोपी नामे १) ज्ञानेश्वर ऊर्फ माऊली दामोदर उपल्ले वय २१ वर्षे रा. गोडेपाटील यांची रुम, अंबिका कॉलनी, अमरदीप कॉलनी शेजारी, श्रीनगर, रहाटणी, पुणे. २) मनिश मच्छिंद्रनाथ कदम वय १९ वर्षे रा. घर नं. २००/४, ज्ञानदीप कॉलनी, श्रीनगर रहाटणी, पुणे. ३) यश सतीश रसाळ वय २१ वर्षे रा. अपर्णा इन्डस्ट्री समोर, स्वास्तीक कॉलनी, बेबीज स्कुल रोड, तापकीरनगर, काळेवाडी, पुणे. ४) प्रसाद सुभाष राऊत वय २४ वर्षे रा. ज्ञानदीप कॉलनी, श्रीनगर रहाटणी, पुणे यांना दि. १०/०८/२०२२ रोजी ०५.०० वा अटक करण्यात आली आहे.** अटक आरोपींची तपासकामी मा. न्यायालयाकडून दिनांक १२/०८/२०२२ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी प्राप्त करण्यात आली आहे. तसेच ०३ विधीसंघर्षीत बालक यांना ताब्यात घेऊन मा. बाल न्यायालय येथे हजर करण्यात आलेले आहे. दाखल गुन्ह्यातील **सराईत गुन्हेगार विजय तलवार, सुनिल शेट्टी यांचा** शोध चालू आहे.

**मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी सर्व नागरिकांना आवाहन केले आहे की, 'दहिहंडी, गणेशोत्सव, नवरात्रौत्सव इत्यादी कोणत्याही सार्वजनीक उत्सवानिमीत्त कोणीही इसम, मंडळ, मंडळाचे कार्यकर्ते हे नागरिक, दुकानदार इत्यादीकडुन जबरदस्तीने वर्गणी घेत असल्यास संबधीत पोलीस स्टेशनला संपर्क करुन तक्रार द्यावी. तसेच सर्व मंडळांना व त्यांच्या कार्यकर्त्यांना कळविण्यात येते की, कोणाही नागरिकांकडुन जबरदस्तीने वर्गणी मागण्यात येऊ नये.'**

सदरची कारवाई मा. श्री. अंकुश शिंदे सो. पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. संजय शिंदे सो. अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा. श्री. आनंद भोईटे सो, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले सो. सहा. पोलीस आयुक्त, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. श्री. सत्यवान माने, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, वाकड पोलीस ठाणे, श्री. रामचंद्र घाडगे, श्री. संतोष पाटील, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि. संतोष पाटील, सपोनि. संभाजी जाधव, सपोनि. अभय दाभाडे, पोलीस अंमलदार बिभीषण कन्हेरकर, बाबाजान इनामदार, वंदु गिरे, दिपक साबळे, स्वप्नील खेतले, अतिश जाधव, प्रमोद कदम, विक्रांत चव्हाण, अतिक शेख, प्रशांत गिलबीले, हनुमंत कुंभार, तात्यासाहेब शिंदे, कौंतेय खराडे, भास्कर भारती, अजय फल्ले व पोउनि रमेश पवार, सागर पंडीत (परि- २ कार्या.) यांनी मिळुन केली आहे.

**(आनंद भोईटे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ २, पिंपरी चिंचवड